**नि.दि.दा.क्र. १६०/२०२०**
**कुंडलिक वि. मोहन**

**MHBI060015622020**

## आदेश नि नंबर ५ वर

(दिनांक १८/०८/२०२३)

वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादीनी मौजे वाघाळा राडी ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील गट क्र. १४१ मधील १ हे ९४ आर पैकी ० हे ९७ आर व पोट खराब ० हे ७ आर चा मालक व कब्जेदार आहे. सदरील अर्ज वादीच्या ताबेकब्जास अडथळा करू नये म्हणुन तुर्तातूर्त मनाई हुकूम आदेश ३९ नियम १,२ दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८, मिळणे साठी दाखल केला आहे.

२. **वादीचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे —**

वादीच्या नावे मौजे मौजे वाघाळा राडी ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील गट क्र. १४१ मधील १ हे ९४ आर पैकी ० हे ९७ आर व पोट खराब ० हे ७ आर ही मिळकत असुन सोईकरीता यापुढे ‘‘वादमिळकत‘‘ म्हणुन संबोधण्यात आली आहे.

**३.** प्रतिवादीचा वादग्रस्त मिळकतीशी कसलेही प्रकारचा संबंध नाही. केवळ वादमिळकतीवर मिळकतीवर अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने वादग्रस्त मिळकतीवरील वादीच्या कब्जे उपभोगास प्रतिवादी हा सतत हरकत अडथळा करीत आहे. दिनांक ०४/०५/२०२० रोजी वादीचा मुलगा बलभीम हा वादग्रस्त मिळकतीत ट्रक्टरने नांगरणी करत असताना प्रतिवादीने वादग्रस्त मिळकतीत येउन वादीच्या कब्जे उपभोगास हरकत अडथळा निर्माण केला. त्याबाबत पोलीस स्टेशन अंबाजोगाई येथे वादीने तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलीसांनी प्रतिवादी

विरोधात कलम १०७ फौ.प्र.सं. अन्वये ८०/२०२० अशी चॅप्टर केस नोंदवून घेतली. दि. ०२/०७/२०२० रोजी प्रतिवादी यांनी आपसात संगनमत करून वादीचा मुलगा बलभीम यास तू पेरणी कशी करतोस असे म्हणून हातपाय तोडण्याची धमकी देउन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. दि. १६/०८/२०२० रोजी वादी वादग्रस्त मिळकतीत सोयाबिनच्या पिकास फवारणी करत असताना प्रतिवादींनी त्यांच्या कामात हरकत अडथळा निर्माण केला व पिकाचे नुकसान केले. त्यामुळे वादीचे कधीही न भरून येणारे असे नुकसान होउ लागले आहे. वादीला सदर दाव्यामध्ये सकृतदर्शनी यश मिळणार असुन अनुकुलतेचा कल देखील वादीच्या बाजूने आहे. त्यामुळे प्रतिवादीने स्वत: किंवा इतरा मार्फत वादीच्या कब्जास अडथळा करू नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम पारित करण्याची विनंती केली आहे.

**४.** याउलट, प्रतिवादी यांनी नि. २० वर त्यांचे लेखी कैफियत दाखल केली. प्रतिवादीने वादीने केलेले सर्व आरोप नाकारले. प्रतिवादीने असे कथन केले की, वादी व प्रतिवादीने आपसांत हिंदू एकत्र कुटुंबातील सदस्य असून त्यांच्या मौजे वाघाळा राडी येथे वेगवेगळया गटामध्ये जमीनी आहेत. वादग्रस्त मिळकतीसहीत इतर गटातील जमीन वादी, प्रतिवादी व कुटुंबातील इतर सदस्यांनी आपापल्या सोईप्रमाणे महसूल अभिलेखात सातबाराला मालकी रकान्यात नोंदी करून घेतलेल्या आहेत. वादग्रस्त मिळकत व गट नं. ९७ मधील जमीन महसूल अभिलेखात वादीच्या नावे नोंद झालेली आहे, परंतु वास्तवीक सदरील जमीनी हया प्रतिवादींच्या ताब्यात व उपभोगात आहेत. प्रस्तूत प्रकरणातील वादी व त्यांचा मुलगा लिंबाजी यांच्या विरूध्द प्रतिवादी क्र. १ व ६ यांनी नि.दि.दा.क्र. २१२/२०१८ दाखल केला होता. सदरील दाव्यात वादी व प्रतिवादी क्र. १ व ६ यांच्या मध्ये तडजोड होउन वादी व त्यांच्या मुलाच्या नावे असलेल्या गट क्र. ९७ मधील ० हे १९ आर जमीन कमी करून प्रतिवादी क्र. १ व ६ च्या नावे असलेल्या गट क्र. ९८ मध्ये अनुक्रमे ० हे १५ आर व ० हे १४ आर करण्याबाबत तडजोड झाली. सदरच्या तडजोडपत्राप्रमाणे वादीने सदरील जमीनीवर प्रतिवादींचा ताबा असल्याचे मान्य व कबूल केले. वास्तविक वादग्रस्त मिळकत

ही प्रतिवादींच्या कब्जेउपभोगात आहे. वादीचे नाव महसूल अभिलेखात सातबाराच्या मालकी रकान्यात असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेउन नि.दि.दा.क्र. २१२/२०१८ मध्ये झालेल्या तडजोडी आधारे प्रतिवादीच्या नावे जमीन करण्याचे टाळण्याकरिता सदरील दावा दुष्ट हेतून दाखल केला. त्यामुळे सदरील अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**५.** वादीच्या कथनाच्या आधारे खालील मुद्दे माझे निष्कर्शासाठी उपस्थित झाले, त्यांना माझे निष्कर्श खालील कारणांसह दिलेले आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | —**होय** — |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | —**होय** — |
| ३ | अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होईल काय ? | —**होय** — |
| ४ | काय आदेश ? | .अर्ज मंजुर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ३** :

**६.** सर्व मुद्ये एकमेकांशी संबंधीत असल्यामुळे व ते चर्चा करण्याकरीता सोईस्कर असल्यामुळे एकत्र विचारार्थ घेतले आहेत.

**७.** वादीने त्याची बाजू सिध्द करण्यासाठी निशाणी ६ वर शपथपत्र दिले, तसेच वाद मिळकत गट क्र. १४१ चा ७/१२ नि. ८ वर, नमुना ८ नि. ९ वर आणि अडथळा केले बाबतचे पोलीस स्टेशन अंबाजोगाई ग्रामीणला पाठवलेले पत्र आणि चॅप्टर खटला क्र. ८०/२०२० ची प्रत दस्त यादी नि. ०४ वर, दाखल केले आहेत.

**८.** वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.डी.शिंदे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीला पुरेशी संधी देउन देखील त्यांनी युक्तीवाद केला नाही. त्यामुळे नि. ५ त्यांच्या युक्तीवादाशिवाय आदेशाकरिता हाती घेण्यात आला.

**०९.** तुर्तातूर्त मनाईचा अर्ज निर्णयीत करतांना प्रथमदर्शनी बाजू, अनुकूलतेचा कल व अपरिमीत नुकसान होणार काय एवढेच पाहणे गरजेचे असते. तसेच तुर्तातूर्त व्यादेशाचा अनुतोष मिळण्याकरीता संबंधीत पक्षकाराने त्यांच्या मागणीमध्ये कायद्याचे समन्वय हे तत्व दर्शवून देणे गरजेचे असते.

**१०.** दस्तऐवज यादी नि नं. ४ वरील दस्तावेज क्र. १ वरील ७/१२ व नमुना ८ अवलोकन केले असता अर्जदाराचे नाव मालक व भोगवटादार म्हणून नोंदविण्यात आल्याचे दिसून येत असल्यामुळे त्यामधील तथ्य व कथनाबाबत व त्याच्या निष्पादनाबाबत खरेपणाचे गृहितक निर्माण होत आहे. तसेच वादीच्या ताब्यात वादमिळकत असल्याचे स्पष्ट दिसून येते. सदर महसुल नोंदीच्या विरूध्द जाईल असा कोणताही विरूध्द पुरावा प्रतिवादीने न्यायालयीन अभिलेखावर सादर केलेला नाही. त्यामुळे वरील कागदोपत्री पुरावा प्रथमदर्शनी वादीचा वादमिळकतीत मालकी हक्काने ताबेकब्जा असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट करतो.

**११.** महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६८ चे कलम १५७ नुसार हक्क नोंदीतील नोंदी जोपर्यंत नाशाबीत होत नाहीत तो पर्यंत खरे असल्याचे

गृहित धरावयाचे आहे. हक्क नोंदी कर निर्णायक पुरावा नसेल तर त्यास गृहितकारी पुरावा म्हणून वापरण्यात येतो. भक्कम साक्षीपुराव्याच्या आभावे जेंव्हा गृहित धरलेले हे सत्य नाशाबीत होईल तेंव्हाच या नोंदी ची पुरावा म्हणून किंमत शुन्य होते. त्यामुळे सदर कागदपत्रातील नोंदीविषयी गृहितक आहे. ज्याक्षणी त्या कागदपत्रा विरूध्द जाईल असा कागदापत्री पुरावा न्यायालयासमोर येईल त्यावेळी त्या कागदपत्रांना महत्व प्राप्त होणार नाही. प्रतिवादीने उपरोक्त महसुल कागदपत्रावर संशय निर्माण होईल किंवा त्यातील नोंदी विरूध्द जाईल असा कोणताही विरूध्द पुरावा किंवा कागदपत्र न्यायालयीन अभिलेखावर दाखल केले नाहीत. त्यामुळे वादीने सादर केलेले कागदपत्रे प्रथमदर्शनी व त्यातील नोंदी आजपावेतो अभेदय राहिलेल्या आहेत व त्या वादीच्या कथनाला सकृतदर्शनी जोड देत आहेत.

**१२.** वादी यांनी दाखल केलेले दस्तावेज व त्यांच्या युक्तीवादाचा विचार करता, न्यायालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेले दस्तावेज हे वादीच्या बाजूने झुकत असून कायदेशीर बाबीदेखिल वादग्रस्त मिळकत वादीच्या कब्जात व मालकीचे असल्याचे प्रथमदर्शनी दर्शवतात. त्यामुळे वादीने त्याच्या कथनात समन्याय हे तत्व दर्शवून दिले आहे. अर्जात प्रथमदर्शनी यश वादीस दिसून येत असून अनुकूलतेचा कल देखिल वादीच्या बाजूने झुकत आहे. वादग्रस्त मिळकतीवर प्रतिवादीचा कोणताही हक्कसंबंध दिसून येत नाही. अशा परिस्थितीत अर्जदार हा प्रतिवादी विरूध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम मागण्यास पुर्णत: हक्कदार आहे. तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्श मी होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. ४ च्या अनुशंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१.  अर्ज  नि. नं. ५ मंजुर करण्यात आला आहे.

२. मौजे वाघाळा राडी, ता.अंबाजोगाई, जि.बीड  येथील सदरील गट क्र १४१  असुन ज्याचे क्षेत्र ० हे. ९७ आर व पोट खराब ० हे. ७ आर जी विस्तृतपणे वादपत्रात वादगमिळकत म्हणून नमूद केली आहे त्या मिळकतीवरील वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस व उपभोगास प्रतिवादींनी अथवा त्यांच्या वतीने इतर कोणीही सदर दाव्याचा निकाल लागेपावेतो कोणताही हरकत व अडथळा करू नये असा तुर्तातूर्त आदेश वादीच्या हक्कात व प्रतिवादी विरुद्ध पारीत करण्यात आला आहे.

BALAVIR NARAYAN GODBOLE

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2023.08.21 17:51:12 +0530

दिनांक : १८/०८/२०२३  ( बा. ना. गोडबोले )
४ थे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
अंबाजोगाई

# CERTIFICATE

| | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Order/ Judgment are same word to word, as per the original order/Judgment. | |
| Name of Stenographer | A. K. Bachate, Jr. Clerk |
| Court | 4th Jt. CJJD & JMFC, Ambajogai |
| Date | 18/08/2023 |
| Judgment signed by the Presiding Officer on | 18/08/2023 |
| Judgment uploaded on | 18/08/2023 |